

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ४९ वा वार्षिक दीक्षान्त समारंभ

शनिवार, दि. १९ जानेवारी, २०१३



## मा. प्रा. (डॉ.) ना. ज. पवार

कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## यांनी सादर केलेला अहवाल

# ४९ वा दीक्षान्त समारंभ

## प्रा. डॉ. एन्. जे. पवार,

**कुलगुरू,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

यांनी सादर केलेला अहवाल

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात संपन्न होत असलेल्या विद्यापीठाच्या ४९ व्या दीक्षान्त समारंभाचे प्रमुख पाहुणे गुजरात केंद्रीय विद्यापीठाचे कुलपती आणि रुरल इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, आनंद या नामांकित संस्थेचे माजी अध्यक्ष प्रा. (डॉ.) योगिंदर अलघ आणि या समारंभात आपण ज्यांना मानद डी. लिट. पदवी देणार आहोत ते मा. पंतप्रधान यांचे सल्लागार डॉ. सॅम पित्रोदा, श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, उपस्थित मान्यवर, आमदार, खासदार, महापौर, नगरसेवक, उद्योजक, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, अधिसभा, विद्या परिषदेचे व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, नूतन पदवीधर, इतर विद्यार्थी, माध्यमांचे प्रतिनिधी आणि बंधू-भगिनींनो,

सुरवातीलाच या दीक्षान्त समारंभात पदवी व पदविका प्राप्त करणाऱ्या सर्व स्नातकांना मी मन:पूर्वक त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा देतो.

मला सांगण्यास आनंद वाटतो की, शिवाजी विद्यापीठ हे छत्रपती शिवाजी महाराज या युगपुरुषाच्या नावाने सुरु झालेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठाला लोकप्रणेते शाहू महाराज, थोर समाजसुधारक महात्मा फुले आणि भारताच्या घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्वांच्या विचारांचा वारसा लाभला आहे. या विद्यापीठाची उभारणी कै. मा. यशवंतरावजी चव्हाण व लोकनेते बॅ. बाळासाहेब देसाई आणि या परिसरातील अनेक मान्यवर यांच्या प्रयत्नातून झाली याचा मी येथे आवर्जून उल्लेख करतो.

आपल्या विद्यापीठाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आपण साजरे करीत आहोत. या सुवर्ण महोत्सवाच्या उद्‌घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. पृथ्वीराज चव्हाण आणि उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. अजितदादा पवार व इतर अनेक मंत्रीमहोदय उपस्थित होते. शासनाच्या वतीने विद्यापीठास सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने सुमारे रुपये ७० कोटीचा भरघोस निधी देण्याचे जाहीर केले होते, त्यापैकी ४५ कोटीचे अनुदानास कॅबीनेटची मान्यता मिळून त्यानुसार शासन आदेशही विद्यापीठास प्राप्त झाला आहे.

विद्यापीठाचे कार्यक्षेत्र कोल्हापूर, सातारा आणि सांगली या तीन जिल्ह्यामध्ये विस्तारले असून संलग्नित महाविद्यालयांची संख्या २७९ वर गेली आहे. शिवाय १३ संशोधन संस्था विद्यापीठाशी संलग्नित आहेत. विद्यापीठात ३९ पदव्यूत्तर शिक्षण देणारे अधिविभाग कार्यरत आहेत. तसेच महाविद्यालयांतूनसुध्दा पदवीबरोबर पदव्युत्तर विभागही सुरु आहेत. सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांना ८ विविध विद्याशाखातून पदवी आणि पदव्युत्तर उच्च शिक्षण आणि संशोधन स्तरावरील शिक्षण दिले जाते. केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या Gross Enrollment Ratio (GER) वाढविण्याचे उद्दिष्ट आणि सर्वसमावेशक धोरण ही भूमिका लक्षात घेवून विद्यापीठाने विद्यापीठ आणि तीनही जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये नवनवीन विभाग आणि विद्याशाखा मंजूर करुन विस्तार कार्य सुरु ठेवले आहे. Inclusion Access and Expansion यामध्ये आम्ही आघाडीवर आहोत. याशिवाय विद्यापीठात महात्मा गांधी, पंडीत नेहरू, राजर्षि शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, संतश्रेष्ठ तुकाराम महाराज, भगवान महावीर या महापुरूषांच्या नावाने अध्यासने सुरू आहेत व काही नवीन अध्यासने सुरू करण्याचा संकल्प केला जात आहे. या अध्यासनांमार्फत लेखन, संशोधन आणि या थोर व्यक्तिंच्या विचारांचा प्रसार आणि जागर सुरु आहे. नॅनोटेक्नॉलॉजी या प्रगत शास्त्रशाखेत युजी/पीजी इंटिग्रेटेड प्रोग्रॅम या वर्षी सुरु केलेला आहे आणि शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानातून यशवंतराव चव्हाण रुरल डेव्हलपमेंट सेंटर हा विभाग सुरु करुन त्याअंतर्गत अनेक रोजगारभिमुख पदव्युत्तर पदवी/पदवीका जून,२०१३ पासून सुरु करणार आहोत.

विद्यापीठातील विविध अधिविभागांनी विविध शिखर संस्थांकडून आणि संशोधन संस्थांकडून गेल्या वर्षभरामध्ये सुमारे १५ कोटी रकमेचा भरघोस निधी प्राप्त केला आहे. विशेष म्हणजे आमच्या प्राध्यापकांनी संशोधन अनुदानासाठी UGC, DBT, DST, ICSSR, RGST Mumbai, SERB, ICHR, SER, CSIR, BRNS, DRDO, NBA, MST, MS & T या सर्व शिखर संस्थांकडून हा निधी प्राप्त केला आहे. आजवरच्या संशोधनासाठी प्राप्त झालेल्या निधीमध्ये हा निधी उच्चांकी आहे असे मला वाटते. सदर अनुदान प्राप्त करण्यामध्ये रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र या अधिविभागांनी व लाईफ सायन्स अंतर्गत बायोकेमिस्ट्री, बायोटेक्नॉलॉजी, बॉटनी आणि

प्राणीशास्त्र या अधिविभागांनी मोठी आघाडी घेतली आहे. यामध्ये रसायनशास्त्र विभागाकडील एकाचवेळी ११ प्राध्यापकांना जवळजवळ १ कोटी ६ लाख असे भरघोष अनुदान प्राप्त झाले आहे. विद्यापीठामध्ये चाललेले हे संशोधन आणि त्यांची गुणवत्ता उत्तरोत्तर वाढते आहे. विद्यापीठाने आणि काही अधिविभागांनी अनेक राष्ट्रीय स्तरावरील संस्था आणि परदेशी विद्यापीठांशी सामंजस्य करार केले आहेत. त्यामध्ये रशिया, जपान, दक्षिण कोरीया, ब्राझील, फ्रान्स, नायझेरिया अशा अनेक देशातील नामवंत विद्यापीठांचा समावेश आहे. त्याचा लाभ अनेक विद्यार्थी आणि प्राध्यापक घेत आहेत.

याबरोबरच विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, या वर्षीच्या फेलो ऑफ महाराष्ट्र ॲकॅडेमी ऑफ सायन्सेस साठी विद्यापीठातील डॉ. एम. बी. देशमुख, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. पी. एन. भोसले आणि भूगर्भशास्त्र विषयातून माझा समावेश आहे. या सर्वाची जणू काही नोंद म्हणून महाराष्ट्र ॲकॅडेमी ऑफ सायन्सेसच्या स्वतंत्र चाप्टरही आपणास मंजूर झाला आहे. मराठी अधिविभागातील डॉ. कृष्णा किरवले यांची ३१ व्या अस्मितादर्श साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. शिवाजी विद्यापीठाचा परिसर हा बायोडायव्हर्सिटी पार्क म्हणून घोषित केलेला आहे. DBT कडून लीड गार्डनसुध्दा या विद्यापीठास मंजूर झालेली आहे. जगातील अत्यंत महत्वाचा पश्चिम घाट आपल्या जवळच आहे त्यासंदर्भात संशोधनही विद्यापीठात सुरु आहे.

विज्ञान शाखेमध्ये आपल्या संशोधनाचा टक्का हा सतत वाढता आहे. याबरोबरच आपला H-Index हा काही दशकापूर्वी १२ होता तो आता ३७ पर्यंत पोहोचला आहे ही आपणा सर्वांना अभिमानाची गोष्ट आहे. सायटेशन इंडेक्समध्ये शास्त्र आणि अभियांत्रिकी शास्त्र यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. उत्पादकतेशीही जोडून असलेले संशोधन यामध्येही आपण पुढे आहोत. विद्यापीठाने अन्य विद्यापीठांच्या सहकार्याने जी कामगिरी बजावली आहे त्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर Collaborative Research Paper मध्ये सुध्दा आपण आघाडीवर आहोत. विद्यापीठास प्राप्त झालेले संशोधन अनुदान, रिसर्च, Publication ही कामगिरी लक्षात घेता आपण Inclusion, Access, Expansion यांच्यापुढे Excellence च्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहोत.

विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विद्यापीठात आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा आणि चर्चासत्रे पार पडली. त्यामध्ये पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या वतीने International Conference on "Sustainable Water Resource Development and Management" ही परिषद आयोजित करण्यात आली होती. सदर परिषदेस श्रीलंकेच्या साबरगामुवा विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. माहिंदा

रुपशिंगे उपस्थित होते. तंत्रज्ञान अधिविभागाच्यावतीने National Conference on "Emerging Technologies for Sustainable Development" या विषयावर परिषद संपन्न झाली. या परिषदेस देशभरातून ६६० संशोधक सहभागी झाले होते. यामध्ये ३०० पोस्टर्सचे सादरीकरण व १५० संशोधन पत्रिकांचे वाचन करण्यात आले. योजना भवन, नवी दिल्ली यांच्या वतीने आय.आय.टी. नवी दिल्ली येथे Prof. Philip G. Altbach, Director, Centre for International Higher Education, Bostan College, United States यांच्या World Class Unviersities in India या विषयावरील आयोजित केलेल्या व्याख्यानाच्या वेळी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे चर्चा आयोजित करण्यात आली होती.

तसेच राजीव गांधी सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी कमिशन, मुंबई, महाराष्ट्र ॲकॅडेमी ऑफ सायन्सेस, इन्स्टिटयूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने A Brain Storming Session on Application of Technology for Sustainable Development in the State of Maharashtra या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा देशातील जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ.अनिल काकोडकर यांच्या उपस्थितीत पार पडली.

झी २४ तास वृत्तवाहिनी व विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण परिषद-२०१२ चे आयोजन करण्यात आले होते. तंत्रज्ञान अधिविभागाच्या वतीने डिपार्टमेंट ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने इन्स्पायर कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. संख्याशास्त्र अधिविभागाच्यावतीने Recent Developments in Statistical Modeling या विषयावर, इतिहास अधिविभागाच्यावतीने Western India in Transition या विषयावर तर वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या वतीने National Seminar on Medicinal Plants : Status & Future या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती.

विद्यापीठाच्या अधिसभा व विद्वतसभा सदस्यांसाठी एक दिवसीय उद्‌बोधन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. हिंदी अधिविभागाच्यावतीने विख्यात हिंदी साहित्यकार विष्णू प्रभाकर यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने हिंदी विभाग व विष्णू प्रभाकर प्रतिष्ठान, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने 'विष्णू प्रभाकर का साहित्य वर्तमान संदर्भ में' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न झाले.

विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विद्यापीठात काही विशेष उल्लेखनीय समारंभही आयोजित करण्यात आले. त्यामध्ये

शिवाजी विद्यापीठ आणि ज्ञानेश्वर मुळे (भारताचे अमेरिकेतील कौन्सुलेट जनरल) शैक्षणिक

संस्था प्रवासी भारतीय कार्य मंत्रालय, भारतीय वंशीय लोकांची जागतिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात ग्रामीण युवकांचे सबलीकरण या विषयावरील आंतरराष्ट्रीय व्याख्यानमाला संपन्न झाली. दि. ९ ऑगस्ट, २०१२ या क्रांतिदिनी विद्यापीठात आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये १५० स्वातंष्यसैनिकांचा सत्कार करण्यात आला. तसेच विद्यापीठाच्या माजी शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा, कर्मवीर भाऊराव पाटील यांची १२५ वी जयंती, माजी शिक्षकांचा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. शेतकऱ्यांसाठी म्हणून दि. १२ ऑक्टोबर, २०१२ रोजी मध्यवर्ती शेतकरी मेळाव्याचे आयोजन विद्यापीठात करण्यात आले.

आदरणीय पाहुणे आणि विशेष करुन डॉ. पित्रोदा साहेबांना मला अभिमानाने सांगावे वाटते की, विद्यापीठाच्या संगणक केंद्रामध्ये अद्यावत डाटा सेंटर व Manuscript Resource Centre चे उद्घाटन मा. नामदार श्री. राजेशजी टोपे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्या हस्ते करण्यात आले. आमच्या २७९ महाविद्यालयांपैकी १६६ महाविद्यालये National Knowledge Network मध्ये जोडलेली आहेत आणि उर्वरित महाविद्यालये या Network मध्ये घेण्याचे काम सुरु आहे.

विद्यापीठ म्हणजे फक्त विद्यापीठाचा परिसर नव्हे तर विद्यापीठाच्या जडणघडणीमध्ये वेगवेगळया भूमिका बजवाणारे सर्व घटक (Stakeholders) म्हणजे विद्यापीठ असे मी मानतो. या सुवर्ण महोत्सवी वर्षात आम्ही जे उपक्रम राबविले आहेत ते पहाता आपल्या असे लक्षात येईल की, यामध्ये विद्यार्थी, संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी या सर्व घटकांना न्याय मिळेल अशा कार्यक्रमांची आखणी केलेली होती आणि त्याच्यापलिकडे जावून समाजाचे उत्तरदायित्व म्हणून काही महत्वाचे सामाजिक उपक्रमही घेतले आहेत.

परीक्षा विभागामार्फत प्रथम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांनी घेण्याच्या प्रक्रियेबाबत कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हयामध्ये महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी जिल्हावार कार्यशाळा आयोजित केल्या होत्या. नोव्हेबर/डिसेंबर, २०१२ मध्ये झालेल्या अभियांत्रिकी शाखेच्या प्रथम वर्षाच्या प्रश्नपत्रिका ई–मोडद्वारे महाविद्यालयांना पाठविण्याबाबत प्राचार्य व संबंधीत कर्मचारी वर्ग यांच्यासाठी विद्यापीठात कार्यशाळा संपन्न होऊन प्रथम वर्षाचे सर्व विषयांचे प्रश्नसंच ई–मोडद्वारे सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांना यशस्वीरित्या पाठविण्यात आले.

सुवर्णमहोत्सवासाठी शिक्षक, प्रशासकीय सेवक, प्राचार्य, महाविद्यालये व माजी विद्यार्थी इ. विविध घटकांकडून विद्यापीठाकडे सुमारे एक कोटी रुपयांचा निधी जमा झाला आहे. विद्यापीठातील वित व लेखा विभागाच्या कामकाजाचे संगणकीकरण पहाण्यासाठी उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबादचे कुलगुरु व त्यांचे सहकारी यांच्या शिष्टमंडळाने विद्यापीठास भेट दिली.

अवकाश संशोधन केंद्राच्या उभारणीसाठी पन्हाळा येथे एक एकर जागा शासनाने विद्यापीठास मंजूर केली आहे.

विद्यापीठाच्या विविध अधिविभागामध्ये रिक्त असलेल्या शिक्षकांच्या अनेक जागा रितसर भरती प्रक्रिया राबवून भरल्या आहेत. त्याबरोबरच प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांची अत्यंत पारदर्शीपणे भरती करण्यात आली आहे.

ग्रामीण महाराष्ट्राच्या या तीन जिल्ह्यातील शेतकरी, कष्टकरी, बहुजन आणि आर्थिक व सामाजिकदृष्टया मागास असलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची बांधिलकी कायम ठेवून हे विद्यापीठ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गुणवत्तेच्या दिशेने वाटचाल करीत आहे याचा मला अभिमान वाटतो.

मध्यमवर्गीय आणि सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना वाजवी शुल्कात तंत्रज्ञान शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून विद्यापीठाने तंत्रज्ञान अधिविभाग सुरु केला आहे. या विद्यापीठात बी.टेक., एम.टेक. आणि पीएच.डी.च्या स्तरावरील शिक्षण दिले जाते. नुकताच हा विभाग TEQIP साठी shortlist झाला आहे.

काही कारणांमुळे मुख्य प्रवाहात येवू न शकणारे विद्यार्थी म्हणजे नियमित शिक्षण घेवू शकत नाहीत त्यांच्यासाठी विद्यापीठाचा दूरशिक्षण विभाग मोलाची कामगिरी बजावित आहे. हजारो विद्यार्थी, बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.बी.ए., मास्टर ऑफ व्हॅल्यूएशन अशा अभ्यासक्रमांचे शिक्षण दूरशिक्षण माध्यमातून घेत आहेत. विशेष म्हणजे देशातील दूरशिक्षण विभागाच्या कामगिरीत हा विभाग उत्तम कामगिरी करीत आहे.

कोणत्याही विद्यापीठाचे ग्रंथालय हे त्यांच्या सध्याच्या Knowledge Society मध्ये अत्यंत महत्वाचे ठरते. आपल्या ग्रंथालयामध्ये लाखो ग्रंथ आणि नियतकालीके आहेत. त्याबरोबरच हजारो ई–जर्नल्ससुध्दा उपलब्ध आहेत आणि आता INFLIBNET च्या माध्यमातून देशातील पहिल्या ५० विद्यापीठाच्या e-resource प्रसारामध्ये आपल्या विद्यापीठाचा ५० विद्यापीठात क्रमांक लागतो. गेल्या ४/५ वर्षात ग्रंथालयाच्या बहुतांश सर्व activities संगणकीकृत झाल्या आहेत आणि त्याचाच भाग म्हणून INFLIBNET या शिखर संस्थेने शिवाजी विद्यापीठाला शोधगंगा या प्रकल्पाअंतर्गत Electronic Thesis and Dissertation प्रयोगशाळा मंजूर केली आहे.

विद्यापीठाचा विकास म्हणजे केवळ अधिविभागांचा विकास असे आम्ही मानत नाही. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयेसुध्दा गुणवत्तेच्या आणि विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहेत. या

महाविद्यालयांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी काही अनुदान देण्याची योजना आपण कार्यान्वित केली आहे. महाविद्यालयीन पातळीवर संशोधनास चालना मिळावी म्हणून विशेष कार्यक्रम राबविले आहेत. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे संलग्नित महाविद्यालयांपैकी १४ महाविद्यालयांना नॅकचे 'ए' मानांकन प्राप्त झाले आहे. महाविद्यालयातून संशोधनाचे कामसुध्दा सुरु आहे आणि अनेक महाविद्यालयांनी कोट्यावधीचा निधी शिखर संस्थांकडून प्राप्त झाला आहे. TEQIP या योजनेखाली विद्यापीठाशी संलग्नित वालचंद कॉलेज आफॅ इंजिनिअरींग, सांगली आणि आर.आय.टी, साखराळे ही दोन अभियांत्रिकी महाविद्यालये स्वायत्त झाली आहेत आणि काही स्वायत्त होण्याच्या मार्गावर आहेत.

विद्यापीठातील क्रिडा विभागाने विविध स्तरावरील स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळविले आहे. त्यामध्ये आंतरविद्यापीठीय स्पर्धेत जलतरण, मल्लखांब, हॉकी, बुध्दीबळ, खो–खो अशा अनेक खेळांमध्ये सुवर्ण, रौप्य आणि कास्यपदके मिळविली आहेत. विद्यापीठाचे काही खेळाडू आंतरराष्ट्रीय पातळीवर जलतरण, शुटींग या स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

एन.सी.सी./एन.एस.एस. या उपक्रमामध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर सहभाग घेतला आहे. विद्यापीठामार्फत राबविण्यात आलेल्या अविष्कार, इंद्रधनुष्य आणि उत्कर्ष या उपक्रमातून विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर उत्तम कामगिरी केली आहे. नुकत्याच पार पडलेल्या उत्कर्ष Event मध्ये विद्यापीठास General Championship पटकाविली आहे.

विद्यापीठास ५० वर्षे पूर्ण झाली आहेत हे लक्षात घेता विद्यापीठाच्या भौतिक सुविधांचे नूतनीकरण, बळकटीकरण आणि नवनवीन अधिविभाग सुरु होत असल्यामुळे नवीन भौतिक सुविधा उपलब्ध करणे याला प्राधान्य देवून अनेक सुधारणा केल्या आहेत. यामध्ये सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे आपण पाण्याच्या बाबतीत ७० ते ८० टक्के स्वयंपूर्ण झालो आहोत. शासनाच्या आणि विद्यापीठाच्या निधीतून आंतरराष्ट्रीय दर्जाचे सिंथेटीक ट्रॅक पूर्णतेच्या टप्प्यावर आहे. नवीन सुरु केलेल्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या इमारती आणि विभागातील विद्यार्थी आणि विद्यार्थीनींसाठी सुसज्ज वसतिगृहे बांधण्यात आली आहेत. विद्यापीठाच्या भव्य लोककला सभागृहाचे विस्तारीकरण झाले आहे. सिनेट हॉलचे समोरील चौकाचे सुशोभिकरण करण्यात आले आहे.

विद्यापीठातील सर्व अधिविभाग आणि विभागांना तसेच महाविद्यालयांना उत्तम इंटरनेट आणि इतर अनुषंगिक सेवा देण्याच्या दृष्टीकोनातून विद्यापीठ परिसरातील जवळ जवळ सर्व विभागांना connectivity

देण्यासाठी **fibreoptics** घालण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. विद्यापीठाचा परीक्षा विभाग आणि महत्वाच्या इमारतीमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या अनेक अधिविभागांची दुरुस्ती आणि विस्तार सुरु आहे.

विद्यापीठ हे शासकीय, बिगर शासकीय आणि उद्योग क्षेत्रातील अनेक संस्थांना मनुष्यबळ पुरविणारे एक महत्वाचे केंद्र असते हे लक्षात घेवून विद्यापीठाचा मध्यवर्ती प्लेसमेंट सेल सातत्याने कार्यरत आहे. त्यामुळे अनेक नामवंत कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्रामध्ये सन २०११–१२ या वर्षीच्या प्रवेश घेतलेल्या ५० विद्यार्थ्यांच्यापैकी ३७ विद्यार्थ्यांची विविध सनदी अधिकारी पदांवर निवड झाली आहे ही विशेष उल्लेखनीय बाब आहे.

विद्यापीठ सुवर्ण महोत्सवी वर्षाचा समारोप दि. २१ जानेवारी, २०१३ रोजी संपन्न होत असून या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय कृषी मंत्री मा. नामदार श्री. शरदरावजी पवार हे उपस्थित रहाणार आहेत. तसेच विधीमंडळाचे सभापती मा. ना. शिवाजीराव देशमुख हे अध्यक्ष म्हणून लाभणार आहेत.

आजच्या या दीक्षान्त समारंभास मा. डॉ. योगिंदर अलघ हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले आहेत. त्यांचा थोडक्यात परिचय करुन देणे मी माझे कर्तव्य समजतो.

मा. डॉ. योगिंदर अलघ, हे सध्या केंद्रीय विद्यापीठ, गुजरात या विद्यापीठाचे कुलपती म्हणून कार्यरत आहेत. तसेच सरदार पटेल इन्स्टिटयूट ऑफ इकॉनॉमिक्स अ‍ॅण्ड सोशल रिसर्च, अहमदाबाद या संस्थेचे उपाध्यक्ष आहेत. राजीव गांधी फौंडेशनचे विश्वस्त म्हणूनही ते काम पहात आहेत.

आनंद येथील रुरल इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष आणि जवाहरलाल नेहरु विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. भारत सरकारच्या ऊर्जा नियोजन आणि कार्यवाही या खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळला होता त्यावेळी त्यांच्याकडे सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी या खात्याची अधिकची जबाबदारीसुध्दा होती. ते गेली अनेक वर्षे योजना आयोगाचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. उद्योग मंत्रालयाच्या अखत्यारीतील ब्युरो ऑफ इंडस्ट्रियल कॉस्टस् अ‍ॅण्ड प्रायसेस याचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. भारत सरकारचे सचिव म्हणूनही त्यांनी कामकाज केलेले आहे.

डॉ. अलघ यांची शैक्षणिक कारकीर्द आंतरराष्ट्रीय दर्जाची आहे. त्यांनी युनिर्व्हसिटी ऑफ पेनिसिल्व्हानिया या विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी घेतल्यानंतर त्याच विद्यापीठामध्ये अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे.

राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्थशास्त्राचे नावाजलेले एक तज्ञ प्राध्यापक म्हणून त्यांची ख्याती आहे. भारतातील आणि भारताबाहेर अनेक नामवंत विद्यापीठातून त्यांनी अध्यापन कार्य केले आहे. त्यामध्ये राजस्थान विद्यापीठ, आयआयएम, कलकत्ता, जोधपूर विद्यापीठ, स्वार्नमोर कॉलेज आणि युनिर्व्हसिटी ऑफ पेनिसिल्व्हानिया या विद्यापीठांचा समावेश आहे. त्यांनी आजवर सात उत्तम ग्रंथ लिहिले आहेत आणि देश/विदेशातील प्रसिध्द रिसर्च जनरल म्हणून १०० पेक्षा जास्त संशोधनपर लेख प्रसिध्द केले आहेत.

डॉ. अलघ यांना त्यांच्या कारकिर्दीत अनेक बहुमान प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये व्ही. के. आर. व्ही. राव अॅवॉर्ड इन इकॉनॉमिक्स, १९८१, सिनियर फेलो, जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, वर्ल्ड इन्स्टिटयूट ऑफ डेव्हलपमेंट इकनॉमिक रिसर्च, हेलिनस्की या संस्थांचा उल्लेख करावा लागेल. नॅशनल अॅकेडेमी ऑफ अॅग्रीकल्चरल सायन्सेस, दिल्ली, इंडियन सोसायटी ऑफ अॅग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स आणि वर्ल्ड इनोव्हेशन फौंडेशन, यु.के. या संस्थांचे ते सन्माननीय फेलो आहेत. साऊथ एशिया टेक्नॉलॉजी नेटवर्क ऑफ द कमिशन ऑफ युरोपीयन कम्युनिटीज, ब्रुसेल्स या कमिशनचे ते निमंत्रक होते.

मला आवर्जून सांगावेसे वाटते की, डॉ. अलघ यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक महत्वाची पदे भूषविली आहेत आणि जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.

UN (RIO) कॉन्फरन्स ऑन इन्व्हायरमेंट अॅण्ड डेव्हलपमेंट या परिषदेसाठी ते युनायटेड नेशन्सचे सेक्रेटरी जनरल यांचे विशेष सल्लागार होते. FAO, UNFPA, ILO, Escap World Bank and UNDP या संस्थांचे ते वरिष्ठ सल्लागार आणि तज्ञ म्हणून मार्गदर्शन करीत होते. कॅनडा, फ्रान्स, युनायटेड स्टेटस आणि याशिवाय अनेक विदेशातील विद्यापीठांतून त्यांनी Visiting Professor आणि विशेष सन्माननीय व्याख्याते म्हणून व्याख्याने दिलेली आहेत. शैक्षणिक क्षेत्रात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर अशी उत्तुंग कामगिरी असलेले पाहुणे या आपल्या समारंभास लाभले त्याचा मला आनंद होतो आहे.

तसेच आजच्या समारंभात ज्यांना आपण डी.लीट. ही सन्माननीय पदवी देणार आहोत ते दूरसंचार क्रांतीचे जनक डॉ. सॅम पित्रोदा यांची ओळख मी आपणास करुन देत आहे.

डॉ. सत्यनारायण गंगाराम पित्रोदा यांचा जन्म ४ मे, १९४२ मध्ये टिटलागड, ओरिसा येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण वल्लभ विद्यानगर, गुजरात येथे व मास्टर्स इन फिजिक्स अॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग, इलिनॉईस इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, शिकागो येथून पूर्ण केले. सन २०१० मध्ये युनिव्हर्सिटी आफ इलिनॉईस, शिकागो येथून सन्माननीय पदवी प्राप्त केली.

सन १९७४ मध्ये ते वेस्कॉन स्विचिंग कंपनीमध्ये रुजू झाले. संशोधन, धोरण ठरविणे, आंत्रप्रेन्युअर व पब्लिक इर्न्फमेशन इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड इनोव्हेशन या क्षेत्रातील सध्याचे पंतप्रधानांचे सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. ते राष्ट्रीय संशोधन (Innovation Council) मंडळाचे अध्यक्ष असून आयटी क्षेत्रात बदल घडवून संशोधनाचा दिशादर्शक आराखडा तयार करण्याचे काम त्यांनी केले आहे. २००५ ते २००९ या कालावधीमध्ये त्यांनी नॅशनल नॉलेज कमिशनचे अध्यक्ष म्हणून उल्लेखनीय काम केले आहे.

सन १९८४ मध्ये मा. पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांचे तांत्रिक सल्लागार म्हणून काम केले आहे. डॉ. पित्रोदा यांनी फक्त भारतातील दूरसंचार क्षेत्रातच क्रांती केली नसून सामाजिक क्षेत्राच्या माध्यमातून विविध दूरसंचार कंपन्या, शैक्षणिक, डेअरी, जलसंवर्धन, तेलबिया इ. क्षेत्राला तंत्रज्ञान कसे फायदेशीर आहे याबाबत एक मजबूत उदाहरण दाखवून दिले आहे. जगभर प्रवास केलेल्या डॉ. पित्रोदा यांनी आपला अधिकाधिक वेळ उच्चस्तरीय आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये व्यतीत केला आहे. त्यांच्या नावावर १०० पेक्षा जास्त पेटंट्स आहेत.

डॉ. पित्रोदा भारतीय दूरसंचार कमिशनचे पहिले संस्थापक अध्यक्ष आहेत. भारताच्या परकीय व खाजगी दूरसंचार धोरणामध्ये डॉ. पित्रोदा यांचे मोठे योगदान आहे. नॅशनल नॉलेज नेटवर्क मध्ये त्यांचे भरीव कार्य आहे. या नेटवर्कचा आपल्या विद्यापीठासही फायदा झाला आहे. आजचा आपला संपूर्ण कार्यक्रम या नेटवर्कमुळे आपण Live Telecast करीत आहोत.

देशभरामध्ये फायबर ऑप्टिक्सचे जाळे विणून त्या माध्यमातून संपूर्ण भारत जोडण्याचे Connecting India त्यांचे स्वप्न पुरे होत आहे.

दिनांक १७ मे, २०११ रोजी जिनिव्हा येथे आयटीयु ने द वर्ल्ड टेलिकम्युनिकेशन ॲण्ड इन्फर्मेशन सोसायटी ॲवॉर्ड देवून गौरविण्यात आले. मानवाच्या सामाजिक व आर्थिक सुबत्तेकरिता माहितीप्रसारण व तांत्रिकतेच्या सहाय्याने केलेल्या योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. डॉ. पित्रोदा यांनी दूरसंचार क्षेत्रात केलेल्या उत्तुंग कार्याचा गौरव त्यांना डि. लिट. ही सन्माननीय पदवी देऊन अनेक विद्यापीठात करण्यात आला आहे.

एकविसाव्या शतकातील जागतिक आणि सर्वच देशांची राष्ट्रीय नीती ही Dialogue, discussion, debate, co-operate and collaborate अशा तत्वावर सुरु आहे. या विद्यापीठाचा कुलगुरु या नात्याने मला आपणास सांगण्यास अभिमान वाटतो की, आपण याच भूमिकेतून पुढे चाललो आहोत. या वाटचालीत आपण सर्वजण आमच्या पाठीशी असणार आहात ही विश्वास व्यक्त करुन मी माझे अहवाल वाचन पूर्ण करतो.

।। जय हिंद ।। जय महाराष्ट्र ।।

प्रकाशक : कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४

मुद्रक : अधीक्षक, शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय, कोल्हापूर-४१६ ००४